प्रेसनोट दि.२९/११/२०२१

मिरा रोड पोलीस स्टेशन येथील दोन पोलीस उप निरीक्षक यांना लाच स्विकारल्याने अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | मिरा रोड पोलीस स्टेशन |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) लोकसेवक पोलीस उप निरीक्षक गोविंद बबनराव एकीलवाले वय ३२ वर्षे रा. रुम नं. ३०६ बि विंग ऑर्चिड, संघवी पार्क, विजय पार्क, मिरा रोड जि.ठाणे.<br>२) लोकसेवक पोलीस उप निरीक्षक श्री.प्रकाश गिरीधर कांबळे वय ३१ वर्षे रा.सी ५०१, ५०२ स्वयंम बिल्डींग नं.२पुनम गार्डन मिरा रोड जि.ठाणे दोन्ही (वर्ग–३)<br>नेमणूक–मिरा रोड पोलीस स्टेशन, मिरा भाईदर पोलीस आयुक्तालय जि.ठाणे.<br>३) खाजगी इसम सुकेश कोटीयन उर्फ अण्णा रा.मिरा रोड जि.ठाणे. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | लोकसेवक क्र १ यांनी२,५०,०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | लोकसेवक क्र १ यांनी५०,०००/–रू.स्विकारुन लाचेची रक्कम घेवून पळून गेले<br>लोकसेवेक क्र२ यांनी तक्रारदार यांना लाचेची रक्कम देण्यास प्रोत्साहन दिले<br>खाजगी इसमक क.३ लाचेची रक्कम घेवून पळून गेले. |
| थोडक्यात हकीगत | :– | मिरा रोड पोलीस स्टेशन येथे यातील तक्रारदार यांचे विरुध्द अर्जदार शहाबुददीन पठाण यांनी फसवणूकी बाबत केलेल्या तक्रारी अर्जाची चौकशी लोकसेवक क्र.१ पोलीस उप निरीक्षक गोविंद एकीलवाले हे करीत होते. सदर अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार यांचे विरुध्द गुन्हा दाखल करुन त्यात त्यांना अटक करु नये या करीता लोकसेवक क्रमांक ०१ यांनी तक्रारदार यांचे कडे १०,००,०००/–रु.लाचेची मागणी केली असले बाबत तसेच सदर लाचेची रक्कम देण्या करीता लोकसेवेक क्र.०२ प्रकाश गिरीधर कांबळे हे तक्रारदार यांना प्रोत्साहीत करीत असले बाबत तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात दि.०२/११/२०२१ रोजी लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.३.११.२०२१ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे क्र.१) पो.उप निरी.गोविंद एकीलवाले यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची निश्चित रक्कम न सांगता संदिग्धपणे लाचेची मागणी केली होती व त्यानंतर दिनांक २६/११/२०२१ रोजी पुन्हा पडताळणी केली असता लोकसेवक क्र.१)यांनी तक्रारदार यांचेकडे २,५०,०००/–रूपये लाचेची मागणी केली त्यावेळी सदर ठिकाणी हजर असलेले लोकसेवक क्र.२)पो.उप निरी. प्रकाश कांबळे यांनी लाचेची रक्कम देण्यास प्रोत्साहीत करुन सदर लाचेची रक्कम दिनांक २९.११.२०२१ रोजी स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन अेसीबी ठाणे युनिटने आज दि.२९.११.२०२१ रोजी मिरा रोड पोलीस स्टेशन येथे सापळयाचे आयोजन केले असता लोकसेवक क. १) पो. उप निरी. एकीलवाले यांनी तक्रारदार यांना त्यांचे खाजगी वाहनाने पोलीस स्टेशन पासून दुर काही अंतरावर नेवून त्यांचे कडून ५०,०००/–रु.लाचेची रक्कम स्विकारली व ती त्यांचा हस्तक खाजगी इसम सुकेश कोटीयन उर्फ अण्णा यांचेकडे देवून ते दोघेही पळून गेले त्यानंतर आलोसे क्र. १ यांना पॅव्हिलीयन हॉटेल जवळ कोर्ट नाका ठाणे येथून व आलोसे क्र.२ यांना त्यांचे राहते घरुन ताब्यात घेण्यात आले. आरोपी क्र.३ खाजगी इसम सुकेश कोटीयन उर्फ अण्णा याचा शोध सुरु आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---


१) संपर्कपत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१

२) संकेतस्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in

३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in

४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net

५) टोलफ्री क्र. :– १०६४

६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९


(उत्तम माने)
पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

Scanned with CamScanner